01 MAR 2023 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## शिवाजी विद्यापीठात विज्ञान दिनानिमित्त प्रदर्शन

# दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांनी अनुभवले शरीररचना शास्त्र

▸ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : 'मानवी शरीराची अंतर्गत रचना कशी असते, हे आज आम्हाला प्रथमच स्पर्शज्ञानाच्या माध्यमातून अनुभवता आले. हा अनुभव अत्यंत रोमांचक ठरला,' अशी प्रतिक्रिया शहरातील विविध शाळांतील दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांनी येथे व्यक्त केली. निमित्त होते शिवाजी विद्यापीठाने जागतिक विज्ञान दिनानिमित्त आयोजित केलेल्या दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांसाठीच्या विशेष विज्ञान प्रदर्शनाचे.

विद्यापीठाच्या समावेशी शिक्षण संसाधन केंद्र व युजीसी स्किम फॉर पर्सन विथ डिसॅबिलिटीजतर्फे आज विज्ञान दिनाच्या निमित्ताने जिल्हा परिषदेच्या विविध शाळांतील दृष्टी-दिव्यांग विद्यार्थी व त्यांच्या विशेष शिक्षकांसाठी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्रातील व्हर्चुअल क्लासरूममध्ये करण्यात आले. अंध विद्यार्थ्यांना विज्ञानातील विविध प्रयोग समजावेत, शरीररचना शास्त्र त्यांनी समजून घ्यावे, जेणेकरून विज्ञानातील संकल्पना त्यांना सुलभपणे समजतील, या हेतूने प्रदर्शनामध्ये अनेकविध त्रिमितीय प्रकल्पांची मांडणी करण्यात आली. ती हाताळून हे विद्यार्थी रचना समजावून घेत होते.



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मंगळवारी विज्ञान दिनानिमित्त दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी विशेष प्रदर्शन आयोजित केले होते. त्यात स्पर्शज्ञानाद्वारे वैज्ञानिक उपकरणांची माहिती कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी विद्यार्थ्यांना दिली. यावेळी शेजारी सतीश नवले, स्वयंसेवक आदी उपस्थित होते.

### प्रदर्शनात विज्ञानविषयक २०० पुस्तके

■ ज्ञानस्रोत केंद्राने विज्ञानविषयक पुस्तके, संशोधन प्रबंधांचे प्रदर्शन मांडले. त्यात शुद्ध विज्ञानासह माहिती तंत्रज्ञान, विज्ञान कथा-कादंबऱ्या, अन्नविज्ञान आदी विषयांवरील सुमारे २०० पुस्तके होती. उपग्रंथपाल डॉ. प्रकाश बिलावर यांनी प्रदर्शनाची माहिती दिली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी प्रदर्शनास भेट दिली. ते म्हणाले, 'अंध विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील प्रयोगांचे हे समजावणे केवळ एका दिवसापुरते मर्यादित न राहता त्यांना कायमस्वरूपी शिकता आले पाहिजे. यासाठी विद्यापीठातील समावेशी शिक्षण संसाधन केंद्र त्यांच्यासाठी पूर्ण वेळ काम करेल.'

प्रकल्प सहाय्यक सतीश नवले म्हणाले, 'विज्ञानाचे नवनवीन प्रयोग दृष्टी-दिव्यांग विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याचा मानस आहे.' प्रदर्शनाच्या नियोजनासाठी राजाराम महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी मयुरी आवळे, पल्लवी राणे, अमृता किल्लेदार, प्रमोद कोराणे, ओंकार कांबळे, तुषार सुतार यांनी स्वयंसेवक म्हणून काम पाहिले. ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार यांनी मनोगत व्यक्त केले. युजीसी स्किम फॉर पर्सन विथ डिसॅबिलिटीज या योजनेच्या समन्वयक डॉ. प्रतिभा देसाई यांनी प्रास्ताविक केले. भगवान लोखंडे यांनी आभार मानले.

01 MAR 2023

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्यसैनिकांचे योगदान समाजासमोर आणूया

## कुलगुरू डॉ. शिर्के : शिवाजी विद्यापीठात इतिहास विभागाची कार्यशाळा

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २८ : 'भारतीय स्वातंत्र्यलढ्यात स्वातंत्र्यसैनिकांचे मोठे योगदान आहे. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अशा स्वातंत्र्यसैनिकांच्या योगदानाचा इतिहास 'अभिवादन स्वातंत्र्य सैनिकांना' या उपक्रमातून समाजासमोर आणूया,' असे आवाहन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले.

विद्यापीठातील इतिहास अधिविभागातर्फे आयोजित स्वातंत्र्य सैनिक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. इतिहास विभाग आणि जनसंपर्क कक्षाने १५ ऑगस्ट २०२२ पासून 'अभिवादन स्वातंत्र्य सैनिकांना' हा उपक्रम सुरू केला. त्यामध्ये विद्यापीठाच्या शिव-वाणी या यूट्यूब चॅनेलवरून रोज एका स्वातंत्र्य सैनिकांची माहिती प्रसारित केली जाते. आतापर्यंत १९५ स्वातंत्र्यसैनिकांची माहिती प्रसारित झाली आहे. त्याअनुषंगाने नुकतीच कार्यशाळा घेण्यात आली. त्यात मराठी विभागप्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. निलांबरी जगताप, डॉ. भरतभूषण माळी (समन्वयक, स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, सांगली), डॉ. अजित कुमार जाधव (समन्वयक, स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, सातारा) आदी उपस्थित होते. इतिहास विभागप्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी प्रास्ताविक केले. डॉ. दत्तात्रय मचाले यांनी आभार मानले.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील इतिहास विभागातर्फे आयोजित स्वातंत्र्य सैनिक कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी मार्गदर्शन केले. यावेळी शेजारी अवनीश पाटील, नंदुकमार मोरे आदी उपस्थित होते.**

लोकमत

# विद्यापीठात आज जपानी सांस्कृतिक कार्यक्रम

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागामार्फत आज, बुधवार, दि. १ मार्चला भाषा भवनात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

जपानी भाषेतील शिक्षण व करिअर संधी या विषयावर जपानच्या एल. एस. पार्टनर्सच्या व्यवस्थापकीय संचालक सायुरी मात्सुनो (टोकिओ) आणि जपान आणि जपानी संस्कृती या विषयावर जपानच्या क्योतो सेईका विद्यापीठातील प्रा. शीन मात्समुरा, प्रा. कोता तोदा, यासुई युको आणि विद्यार्थी टी सेरेमनी, पारंपरिक जपानी खेळ केन्दामा, कारुता, ओरिगामी, जपानी गीते असा सांस्कृतिक कार्यक्रम सकाळी ११ वाजता वि. स. खांडेकर भाषा भवनात होणार आहे. उपस्थित राहण्याचे आवाहन इंटरनॅशनल अफेअर्स सेलचे संचालक प्रा. डॉ. एस. बी. सादळे आणि विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले आहे.

पुढारी

# रोपथेरपी अनेक आजारांवरील परिणामकारक उपचारपद्धती

## - डॉ. भाऊराव देशमुख

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

रोपथेरपी व निसर्गोपचार ही माणसाची जीवनपद्धती आहे. याच्या परिणामकारक वापरामुळे अनेक आजारांपासून सहज दूर राहता येते, असे मत लातूरचे निसर्गोपचारतज्ज्ञ डॉ. भाऊराव देशमुख यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ आजीवन अध्ययन व विस्तार विभागाच्या वतीने आयोजित व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विभागप्रमुख डॉ. रामचंद्र पवार होते. डॉ. देशमुख यांनी रोपथेरपीची प्रात्यक्षिके दाखवली व आधुनिक काळातील त्याचे महत्त्व अधोरेखित केले. त्याशिवाय विविध औषधी वनस्पतींची ओळख करून देतानाच निसर्गोपराचे मानवी जीवनातील स्थानही सांगितले. पाहुण्यांची ओळख श्वेतलिना पाटील यांनी करून दिली. प्रास्ताविक डॉ. सुमन बुवा यांनी केले.

यावेळी सहाय्यक प्रा. यशोधन बोकील, आसावरी कागवाडे, आर. एम. जाधव, अमर घाटगे, निखिल चव्हाण, महेश नायकवडी उपस्थित होते. आभार उदय घाटे यांनी मानले. सूत्रसंचालन रवींद्र खैरे यांनी केले.

01 MAR 2023

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वणवा...



## भवताल

डॉ. व्ही.एन. शिंदे

निसर्गातील प्रत्येक जीवाची निर्मिती विशिष्ट हेतूने झालेली असते. प्रत्येक सजीवांचे दुसऱ्या सजीवांशी काही नाते असते. त्यामुळे जैवसाखळी निरंतर सुरू असते. या गवतावर गाय, म्हैस, शेळी, मेंढी ही पाळीव जनावरे जगतात. या प्राण्यांना मांसाहारी प्राणी वाघ, बिबट्या, चित्ता खातात. जंगलातील तृणभक्षी प्राण्यांनाही ते खातात. या साखळीमध्ये गवत हा पहिला जीव. मोकळ्या रानात, जंगलात गवत वाढते. पावसाळ्यांमध्ये गवत उगवते आणि वाढत जाते. पावसाळा संपल्यानंतर वाळायला सुरुवात होते. वाळलेले गवतही ते प्राणी खातात. जंगलातील, गवत पेटलेले अनेकदा दिसते आणि मनात विचारांचा वणवा पेटतो.

आजही विविध कारणांनी वणवे पेटतात. पूर्वी घनदाट जंगले होती. या जंगलातील झाडांच्या फांद्या परस्परांना घासून ठिणग्या पडत. त्या खालच्या वाळलेल्या पानांवर आणि गवतावर पडून निसर्गतः वणवे लागत. यातून जंगलातील वाळलेली झाडे पेटत. उन्हाळ्यात पाऊस पडण्यापूर्वी कडाडणाऱ्या विजांमुळे वणवा पेटत असे. मोठी झाडे मोडून पडत असताना होणाऱ्या घर्षणामुळेही ठिणग्या पडून वणवे पेटत असायचे. गवत आणि पाने कुजून मिथेन वायुची निर्मिती होते आणि ऊष्णतेमुळे तो पेटून वणवे लागत असत. मात्र, आज नैसर्गिक वणवे पेटण्यासारखी परिस्थितीच राहिली नाही. ॲमेझॉनसाररखी काही अपवादात्मक जंगले वगळता इतर ठिकाणी घनदाट जंगले नाहीत. अशा घनदाट जंगलात पेटलेले वणवे अनेक दिवस धुमसत असायचे. पूर्वी बहुतांश वणवे नैसर्गिक कारणांनी लागत.

आज अशाप्रकारे नैसर्गिक कारणांनी लागणाऱ्या वणव्यांची संख्या ही पंधरा टक्क्यांपेक्षा कमी आहे. तर जगात लागणाऱ्या वणव्यांमध्ये ८५ टक्के वणवे हे मानवनिर्मित असतात. जंगलाला, गवताला जाणीवपूर्वक पेटवण्यात येते. त्याव्यतिरिक्त जंगलातून जाणाऱ्या विद्युत वाहक तारांच्या ठिणग्यांमुळेही वणवे पेटतात. अनेक लाकूड व्यावसायिक जंगलातील लाकूड मोठ्या प्रमाणात मिळावे, या हेतूने कामगारांच्या हातून वणवे पेटवतात. त्यामुळे जंगलातील मोठमोठी झाडे वाळतात. वाळलेली लाकडे मोठ्या प्रमाणात कापण्याचा परवाना त्यांना मिळतो. काही आदिवासी लोक शेतीसाठीची जमीन दरवर्षी बदलतात. त्यासाठी जमीन भाजतात. त्या वेळीही जंगलात आग पसरते. मध गोळा करणारे लोक मध काढताना टेंभा पेटवतात. तो व्यवस्थित न विझवता टाकल्यासही वणवे लागतात. मोहफुले वेचणारी मंडळी झाडाखालची जमीन स्वच्छ राहावी, यासाठी झाडाखालची पाने पेटवतात. जंगलात फिरणारे गुराखी, पर्यटक फिरताना विडी, सिगारेट ओढतात. त्या वेळी पेटवण्यासाठी वापरलेली काडी किंवा विडी-सिगारेट तशीच फेकून देतात, त्यामुळेही वणवे पेटवतात. अनेक गुराखी, जंगलातील गवत कापणारे लोक, पुढच्या वर्षी गवत चांगले यावे या गैरसमजातून गवत पेटवतात. काही लोक गंमत म्हणून आग लावतात, तर काही लोक सूडाच्या भावनेने आग लावतात.

अमेरिकेच्या कोलॅराडो जंगलात लागलेला वणवा विझवण्यासाठी काही वर्षे लागली होती. २०१९ साली ॲमेझॉन जंगलामध्ये लागलेली आग विझवण्यास काही महिने लागले होते. त्यामध्ये अनेक प्राणी, पक्षी मरतात. गवत, झाडे आणि लाकूड पेटल्याने वातावरणात कार्बन डाय ऑक्साईड आणि कार्बन मोनॉक्साईड वायूंचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढते. त्यांचे वातावरणातील प्रमाण वाढल्याने वायू प्रदूषण वाढते. वणव्यामुळे जंगलातील पाण्याच्या साठ्यांचे तापमान वाढून पाण्यातील जीवसृष्टीलाही धोका निर्माण होतो. १९९८ ते २०१७ या वर्षांत जगभरांमध्ये लागलेल्या वणव्यांमुळे २४०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला. गुदमरणे, घातक वायूंमुळे आजारी पडणाऱ्या लोकांची संख्या लाखात आहे. जनावरे, पशू-पक्षी यांची संख्या मोजण्यापलीकडे असते. त्या भागातील जैवविविधतेवर मोठे अनिष्ट परिणाम होतात. अनेक प्रजाती नष्ट होतात. मार्च महिन्यात वणवे मोठ्या प्रमाणात लागतात. वर्षभरातील एकूण वणव्यापैकी ४४ ते ६६ टक्के वणवे मार्च महिन्यात लागतात. २०१२ ते २०१६ या काळात भारतात लागलेल्या वणव्यांची संख्या एक लाख, दोन हजार ५२७ इतकी आहे. त्यातील सात हजार ५३४ वणवे महाराष्ट्रात लागले. अशा वणव्यांमध्ये हजारो हेक्टरवरील जंगल नष्ट होते.

वणव्याचा आणि माझा बालपणीच संबंध आला. शालेय जीवनात नाग वंशाचा विनाश करण्यासाठी पांडव खांडव वन पेटवतात, यावर आधारित धडा होता. तो धडा मनापासून शिकवताना गुरुजी तल्लीन झाले होते. ते वर्णन इतके समरसून करत होते की, वणवा कसा असतो हे पाहायची इच्छा निर्माण झाली. आमची बार्शी तालुक्यातील चिंचोली गावातील शाळा भवानीआईच्या माळाच्या पायथ्याला होती. तेथे भरपूर गवत असायचे. बांधावर झाडे होती. गुरुजींनी वर्णन केल्याप्रमाणे वणवा असतो हे पाहायचे होते. शाळा दोन सत्रात भरायची. मध्ये चार तास सुट्टी असायची. आम्ही सुट्टीत जेवण करून खेळत असायचो. एक दिवस मधल्या सुट्टीत पूर्वनियोजनानुसार काडीपेटीने मी माळाच्या पायथ्याशी असणारे गवत पेटवले. वाहत्या वाऱ्यामुळे आग वेगाने पसरली. गुरुजी मधल्या सुट्टीनंतर शाळेकडे येत होते. त्यांना ती आग दिसली. त्यांनी आणि गावकऱ्यांनी ती विझवली. मात्र, शे-दीडशे एकरावरील गवत आणि झुडपे जळून खाक झाली होती. शाळेत येताना त्यांच्या शोधक नजरेने, आग शाळेजवळून लागल्याचे ओळखले. त्यांनी शाळेत आग कोणी लावल्याचे शोधायला सुरुवात केली. अखेर शोध लागला आणि मला बेदम मार मिळाला. संध्याकाळी बातमी वडिलांना समजली आणि त्यांनी परत मार दिला. दुहेरी मारांने माझे अंग ठणकत होते. मात्र, त्यावेळी वडिलांचे स्वगत सुरू होते.

या स्वगतात त्या आगीमुळे कोणकोणते नुकसान झाले? याचे त्यांचे मनाशी पुटपुटणे सुरू होते. ते माझे कान टिपत होते. आगीमुळे जनावरांच्या तोंडचा घास मी नष्ट केला होता. अनेक पक्ष्यांच्या छोट्या पिल्लांना मारले होते. सशांची पिल्लीही मेलेली असणार होती. अनेक झुडुपांची फळे जी पशु-पक्ष्यांची भूक भागवणार होती, ती नष्ट झाली होती. झाडांची वाढ त्यामुळे कमी होणार होती. अशा अनेक गोष्टी कानावर पडत होत्या. मी त्या ऐकत होतो. त्यातून मला माझी चूक उमगली होती. तितक्याशा गांभिर्याने नाही, पण आपण फार मोठी चूक केली एवढे लक्षात येत होते. त्या दिवशीच्या दुहेरी माराचे वळ कधीच गेले; मात्र निसर्गप्रेमाचे लावलेले वळण आजही कायम आहे. त्यावेळेपासून कोठेही गवत, जंगल पेटलेले दिसले की अस्वस्थ होतो. कोणताही विचार न करता ती विझवायला पुढे जाऊ लागलो. पदाचा, शिक्षणाचा विचार न करता हे नकळत होते. पुढे शिक्षण जसे पुढे जात राहिले, वाचन वाढत गेले, तसे वणव्याचे आकलन जास्त चांगले झाले. वणवा किती वाईट आहे हे समजले. सर्वांनी समजून घ्यायला हवं!

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६७३७८४४००